## ऑनलाईन अर्ज खालीलप्रमाणे भरावा

होमगार्ड विभागाच्या https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login१.php या संकेत स्थळावर जावुन HGs ENROLLMENT या मेनू मधून ONLINE ENROLLMENT FORM हा सबमेनू निवडावा.

१. सर्व प्रथम जिल्हाSelect करावा . ***(ज्या जिल्हयात नोंदणी जाहीर झाली असेल तोच जिल्हा मेनू मध्ये उपलब्ध असेल.)***

२. त्यानंतर आपण ज्या पोलीस ठाणेच्या हददी मध्ये राहता त्या विभाग ज्या होमगार्ड पथकामध्ये येतो ते पथक आणि पोलीस ठाणे Select करावे व **पुणे** जिल्हयाच्या अंतर्गत येणारे होमगार्ड पथकातील रिक्त जागा याकरीता खालील तक्ता पहावा.

| अ.क्र. | होमगार्ड पथक/उपपथक | अंतर्गत येणारे पोलीसस्टेशन | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | बारामती | बारामती शहर, बारामती तालुका, वडगाव निंबाळकर, सुपा, मळेगाव | ८२ | १९ | १०१ |
| २. | भोर | भोर, राजगड, वेल्हा | ३९ | १७ | ५६ |
| ३. | दौंड | दौंड, यवत | ०३ | ०५ | ०८ |
| ४. | घोडेगाव | घोडेगाव, मंचर, पारगाव | २७ | १४ | ४१ |
| ५ | इंदापूर | इंदापूर | १२ | २१ | ३३ |
| ६. | जुन्नर | जुन्नर, नारायणगाव,आळेफाटा, ओतूर | २७ | ४२ | ६९ |
| ७ | खेड | खेड | १७७ | ४२ | २१९ |
| ८ | लोणीकाळभोर | पुणे ग्रामिण नजीकचे पोलीस स्टेशन | ६६ | १९ | ८५ |
| ९ | पौड | पौड | ५७ | २० | ७७ |
| १० | पुणे शहर | पोलीस आयुक्त पुणे शहर व पिंपरी चिंचवड | ४८२ | ९८ | ५८० |
| ११ | सासवड | सासवड, जेजुरी | ८६ | १४ | १०० |
| १२ | शिरूर | शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव MIDC | ४४ | ३९ | ८३ |
| १३ | उरळीकांचन | उरळीकांचन | ८० | १८ | ९८ |
| १४ | वडगावमावळ | वडगावमावळ, लोणावळा शहर, लोणावळा ग्रामिण, कामशेत | १०४ | ५६ | १६० |
| १५ | वालचंदनगर | वालचंदनगर, भिगवण | ७३ | १७ | ९० |
| | **एकूण** | | **१३५९** | **४४१** | **१८००** |

**( वरिल तक्त्यामधील रिक्त होमगार्ड संख्या वाढविणे किंवा कमी करणे बाबतचे सर्वस्वी अधिकारी जिल्हा समादेशक होमगार्ड पुणे यांनी राखून ठेवले आहेत.)**

३. आपला १२ अंकी आधार क्रमांक काळजीपुर्वक भरावा. चुकीचा भरल्यास अर्ज बाद ठरविला जाईल.

४. यानंतर लिंग, संपुर्ण पत्ता, शिक्षण, व्यवसाय, ई-मेल आयडी, ही माहीती काळजीपुर्वक भरावी.

५. वरील जाहीरातीमध्ये दिल्या प्रमाणे ज्या प्रकारची तांत्रिक अर्हता आहेत त्यांची संख्या Select करावी. ***( उदा. उमेदवार जड वाहन परवानाधारक ,प्राविण्यप्राप्त खेळाडू आणि NCC B प्रमाणपत्र धारक असेलतर तांत्रिक अर्हता संख्या तीन (Three) राहील).***

